## ना टेंडर... ना लिलाव...

# तरी वर्धा नदी रोज शेकडो ब्रास वाळूचा अवैध उपसा

### महसूल विभागाकडून हेतूपुरस्सर दुर्लक्ष | गौण खनिजासाठी रात्रभर केले जाते उत्खनन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** – गौण खनिजासाठी अद्याप रेती घाटांकरिता निविदा निघालेली नाही आणि कोणत्याही प्रकारचा लिलावही झाला नाही. तरी अवैध व्यवसायिकांकडून वर्धा नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर गैरकायदेशीरित्या उत्खनन केले जात असून शेकडो ब्रास वाळूची तस्करी सुरू आहे. वर्धा नदीच्या घाटावर रात्रभर हा गोरख धंदा राजरोसपणे सुरू असतो मात्र त्यानंतरही महसूल विभाग याकडे हेतू पुरस्कर दुर्लक्ष करीत आहे. अवैध उत्खनन व गौण खनिजाची तस्करी रोखण्यासाठी महसूल विभागाने गठित केलेले विशेष पथक केवळ कागदावरच अस्तित्वात असल्याचे दिसून येत आहे.



वर्धा नदीकाठी फत्तेपूर नमस्कार चांदूर ढोरे धाम मंत्री कौंडण्यपूर या ठिकाणी घाटांवर वाळूचा मोठ्या प्रमाणात उपसा केला जातो. हे काम रात्रीच्या अंधारात केले जाते. त्यानंतर शेकडो ब्रास वाळू हायवा टिप्पर व ट्रॅक्टर या वाहनांतून तस्करी करून वाहून नेली जाते.

या अवैध उत्खननामुळे वर्धा नदीच्या पात्रात चे मोठे नुकसान होत असून त्यामुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. महसूल विभागाला या अवैध वाळू उपसा व तस्करी ची माहिती असतानाही संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्याची धोरण अवलंबिली आहे. वाळूला सोन्याचा भाव आहे. या अवैध व्यवसायातून सरकारचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत आहे. सरकारची नुकसान होत असताना महसूल विभागातील तलाठी तहसीलदार व अन्य अधिकारी कर्मचारी काय करत आहेत असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून दुर्लक्ष

गाव पातळीवरील महत्त्वाचे महसूल कर्मचारी तलाठी व कोतवाल यांच्याकडून या अवैध व्यवसायाकडे दुर्लक्ष केले जात आहे. राजरोसपणे वाळूचा उपसा व तस्करी सुरू असताना कोणतीही कारवाई केली जात नाही. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सर्वसामान्य जनतेला बांधकामासाठी मुबलक दरात रेती व अन्य दोन खनिज उपलब्ध करून देण्याची भूमिका चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतली असून त्यामुळे रेती घाटांचा लवकरच लिलाव होण्याची शक्यता आहे. तिवसा तालुक्यात मात्र लिलाव होण्यापूर्वीच अवैधरीत्या नदीपात्रातून वाळूचा उपसा व अवैध तस्करीचा गोरख धंदा सुरू आहे. त्याविरोधात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ पावले उचलून कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

### दिवसभरात हजारो रुपयांची वाळू लंपास

तालुक्यातील नदीपात्रात गेल्या महिनाभरापासून कुठलीही परवानगी नसताना बेसुमार वाळू उपसा केला जात आहे. दिवसभर किन्हीच्या सहाय्याने तयार केलेल्या तराफ्याद्वारे नदीपात्रातील वाळू ओढली जाते. काठावर आणून वाळूचा साठा केला जातो. दिवसभर दोन तराफ्याद्वारे ट्रॅक्टर, हायवा व टिप्परने वाळूचा उपसा केला जातो व रात्री ही वाळू ट्रक अथवा ट्रॅक्टरमध्ये भरून तिची तस्करी केली जाते. दिवसभरात 25 ते 50 हजार रुपयांची वाळू नदीपात्रातून काढली जात आहे.

# भटक्यांच्या तांड्यावरच्या बालकांचं ऐतिहासिक साहित्य संमेलन

### वंचित मुलांना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी आगळा वेगळा सोहळा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** – समाजानं वर्षानुवर्ष नाकारलेल्या आणि गावाबाहेर तांड्यावर आयुष्य जगणाऱ्या कुटुंबातील बालकांचा शिक्षणाशी संबंध अभावानेच येतो. अशा परिस्थितीत या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांचं खास साहित्य संमेलन अमरावती जिल्ह्यात नांदगाव खंडेश्वर तालुक्यातल्या मंगरूळ चव्हाळा या गावात होत आहे. भटक्या जमातीच्या नव्या पिढीला शिक्षणाची कवाडे खुली करण्यासाठी प्रयत्न करणारे मतीन भोसले यांनी आपल्या प्रश्नचिन्ह आदिवासी आश्रम शाळा येथे दोन दिवसीय बाल साहित्य संमेलन हा आगळावेगळा ऐतिहासिक सोहळा आयोजित केलाय. प्रश्नचिन्ह आदिवासी आश्रम शाळेच्या पहिल्या राज्यस्तरीय बालसाहित्य संमेलनाला प्रसिद्ध कवी अनंत राऊत आणि किशोर बळी उपस्थित होते. धामणगाव रेल्वेचे आमदार प्रताप अडसड, यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी मतदारसंघाचे आमदार राजू तोडसाम, आदिवासी विभागाचे अप्पर आयुक्त जितेंद्र चौधरी, आर्मीचे तहसीलदार परसराम भोसले, हे या संमेलनाला प्रामुख्याने उपस्थित होते. चोरी करणं, भीक मागणं असंच आयुष्य पिढ्यान पिढ्या ज्यांच्या नशिबी आलं अशा समाजातील मुलांना गेल्या दहा वर्षांपासून शिक्षणाची गोडी लावत मंगरूळ चव्हाळा या गावालगत मतीन भोसले यांनी प्रश्नचिन्ह या नावानं निवासी शाळा सुरू केली. आज अक्षरज्ञानासोबतच सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे नेमकं जग काय आहे, आयुष्य कशाला म्हणतात, याची जाणीव होणाऱ्या चिमुकल्यांमधील कलागुणांना वाव मिळावा हा उद्देश समोर ठेवून या बालकांचं खास साहित्य संमेलन आयोजित करण्याची अनोखी कल्पना मतीन भोसले यांना सुचली. आता दोन दिवसीय बाल साहित्य संमेलनाच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांमधील कलागुणांना खास दालन उपलब्ध झालं. हा सोहळा म्हणजे आमच्या विद्यार्थ्यांना शिक्षण आणि कला क्षेत्रातील नव्या जगाची ओळख व्हावी असा आहे. यानिमित्ताने नामवंत कवी आणि कलावंत आमच्या शाळेत आलेत हे आमच्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचं मतीन भोसले यांनी 'महासागर' शी बोलताना सांगितले.

### तांड्यावरच्या चिमुकल्यांमध्येही अनोखे कलागुण

खरंतर साहित्य संमेलन म्हटलं की एक विशिष्ट वर्ग डोळ्यासमोर येतो. आमच्या प्रश्नचिन्ह निवासी आदिवासी आश्रम शाळेचे संचालक मतीन भोसले यांच्या संकल्पनेतून बालसाहित्य संमेलन हा अनोखा सोहळा तांड्यावरच्या चिमुकल्यांमध्ये असणाऱ्या कलागुणांना उजाळा देणारा आहे, असं शाळेतील शिक्षिका लक्ष्मी खांडेकर 'महासागर' शी बोलताना म्हणाल्या. हे पहिलं अशा प्रकारचं राज्यस्तरीय बाल साहित्य संमेलन असून समाजानं दुर्लक्षित केलेल्या घटकांमधील चिमुकल्यांमध्ये देखील सूप्त कला गुण दडले आहेत, त्यांना देखील त्यांचं चांगलं भविष्य घडवण्याची संधी आहे याची जाणीव या बाल साहित्य संमेलनाद्वारे होते आहे. हे खरंतर मोठं यश असल्याचं देखील लक्ष्मी खांडेकर म्हणाल्या.

### आपण वाईट नाही चांगलेच हे कायम मनात ठेवा

खरंतर तुम्ही चांगले नाहीत असं आजवर आपल्याला अनेकांनी म्हटलं. यामुळे आपण वाईट आहोत अशीच आपली मानसिकता बनली. खरं तर आपण वाईट नाही, तर चांगले आहोत, असं कायम आपल्या मनात ठसवा. आपल्याला आपल्या समाजाला प्रगती करायची आहे, शिकून मोठं व्हायचं आहे. यामुळे आपण चांगले आहोत, असा विश्वास स्वत:मध्ये निर्माण करा, असा सल्ला आमदार प्रताप अडसड यांनी यावेळी प्रश्नचिन्ह निवासी आदिवासी आश्रम शाळेतील चिमुकल्यांना दिला.

# बहिरम यात्रेत शिरजगाव पोलिसांचा कहर

## युवकाला अमानुष मारहाण

### बहिरम यात्रेत 15 दिवसात चौथे प्रकरण

बहिरम यात्रेदरम्यान 15 दिवसात ही चौथी घटना असून 3 घटना या मध्यस्थीने सोडवण्यात आल्या. मात्र या घटनेत पोलीसांकडून अमानुष मारहाण झाली आहे. आता पोलीस अधीक्षक या प्रकरणी काय कारवाई करतील ? हे पाहण्यासारखे राहील.





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.23 )**– तालुक्यातील नामांकीत बहिरम यात्रेतील भाविक पोलिसांच्या वागणूकीमुळे हैराण होत आहे. मात्र यावर कुणाचाच अंकुश उरलेला दिसत आहे. हल्लीच यात्रा फिरायला आलेल्या एका युवकाला पोलिसांनी अमानुष मारहाण केल्याचे पुढे आहे. याप्रकरणी पोलीस अधिक्षक विशाल आनंद सिंगुरी यांना तक्रार करण्यात आली आहे.

तालुक्यातील वणी येथील रहिवासी संजय बाबाराव ठाकरे असे अमानुष मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ठाकरे दि. 21 जानेवारी ला मित्रांसोबत बहिरम यात्रेमध्ये आले होते. शंकर पट पाहून झाल्यावर सायंकाळी 4 दरम्यान त्या ठिकाणी वरून बाहेर जात असताना लागलेल्या बॅरिकेटमधून शिरण्याचा प्रयत्न करताना त्यांना पोलिसांनी बेताने बेदम मारहाण केली. तसेच खिशातून 6000 रुपये देखील काढून घेतल्याचा आरोप तक्रारित केला आहे. या प्रकाराची तक्रार करण्यासाठी बहिरम पोलीस चौकीत गेल्यावर चौकी मधील पोलीस कर्मचाऱ्यांनी तू घरी जा नाहीतर पोलीस कामात अळथडा आणला म्हणून तुझ्यावरच गुन्हा दाखल करु अशी तक्रारदाराला धमकी दिली. दि. 22 जानेवारीला ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी गेल्यावर डॉक्टरांनी इतका मार कशाचा आहे, अशी विचारणा केल्यावर तक्रारदाराने सर्व हकीगत सांगितली.

त्यानंतर डॉक्टरांनी चांदुर बाजार पोलिसांना बोलावून तक्रारदाराचे मेडीकल केले व बयाण नोंदविले. परंतू त्यांनी पोलीस कर्मचारी दारु पिवून होते व सहा हजार काढून घेतले हे बयाणात नोंदवून घेतले नसल्याचे तक्रारकर्त्यांचे म्हणने आहे. तक्रारकर्त्यांनी सदर प्रकरणाची जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक शिरजगाव कसबा यांना तक्रार देवून अमानुष मारहाण करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# आमदार सांस्कृतिक महोत्सव आजपासून



### तीन दिवस भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** – विदर्भाची सांस्कृतिक नगरी म्हणून अमरावतीचा नावलौकिक आहे. कला, क्रीडा, सांस्कृतिक आदी वैभवाचे नेहमीच जतन करून प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठान च्या वतीने नेहमीच अमरावतीकरांना विविध कला-क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांची बहारदार मेजवानी प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठानच्या माध्यमातून वतीने येत्या 24, 25,व 26 जानेवारी 2025 रोजी तीन दिवसीय अमरावती आमदार सांस्कृतिक महोत्सव-2025 अनुभवायला मिळणार आहे. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे हे आयोजन करण्यात आले आहे. सर्व रसिक अमरावतीकरांनी या महोत्सवाला उपस्थित राहून सर्व कार्यक्रमांचा मनमुराद आनंद लुटावा. असे आवाहन प्रविण खोडके मेमोरियल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठानच्या अध्यक्ष आ.सुलभा संजय खोडके यांनी एका पत्रकार परिषदेतून केले. या आयोजनात विदर्भस्तरीय भव्य पुष्प प्रदर्शनी व स्पर्धा, समूह नृत्य स्पर्धेतून बहरदार नृत्याविष्कारांचे सादरीकरण, स्वरशोध हिंदी-मराठी विदर्भस्तरीय खुली सिने गीत गायन स्पर्धांचे सादरीकरण होईल. शुक्रवार दिनांक 24 जानेवारी 2025 रोजी दुपारी 2.00 वाजता सांस्कृतिक महोत्सवाचे उदघाटन व विदर्भ स्तरीय भव्य पुष्प प्रदर्शनी व स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला सौरभ कटीयार, जिल्हाधिकारी, अमरावती, नवीनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त अमरावती शहर, संजिता मोहपात्रा ,मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, विशाल आनंद सिंगुरी, पोलीस अधीक्षक अमरावती जिल्हा, सचिन कलंत्रे, आयुक्त महानगर पालिका अमरावती. यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

तर यावेळी प्रसिद्ध सिने अभिनेत्री डेझी शाह (जय हो फेम ) यांची विशेष उपस्थिती आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. त्यानंतर दुपारी 4.00 वाजता पासून स्वर शोध हिंदी-मराठी विदर्भस्तरीय खुली सिनेगीत गायन स्पर्धेला सुरुवात होणार आहे.



## बाजार व परवाना विभाग

### इतवारा बाजार सायकल स्टॅंड येथील वाहनतळ कंत्राट पद्धतीने चालविण्या करीता ई-निविदा प्रणाली द्वारे निविदा सुचना (२०२४-२५)

**(जा.क्र.१००५ दि. २२/०१/२०२५) २०२५-एएमसी-११४०९३६-१**

(शुद्धीपत्रक :- या पुर्वी ऑफलाईन माध्यमातून अमनपा/बा.व.प./९९५/१७/०१/२०२१५ निविदा मागविण्यात आलेली आहे. सदर ऑफलाईन निविदा रद्द करून ऑनलाईन ई-निविदा द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.)

मा. आयुक्त यांचे वतीने अमरावती महानगरपालिकेच्या बाजार व परवाना विभागामार्फत खालील कामासाठी कंत्राटदाराकडून ई-निविदा प्रणाली द्वारे ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | शासकीय मुल्य | बयाणा रक्कम | निविदा फार्मची किमत रूपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अमरावती महानगरपालिका मालकिचे इतवारा बाजार येथील सायकल स्टेंडची जागा वाहनतळ चालविण्या करिता ५ वर्ष करिता प्रति वर्ष प्रमाणे महत्तम रक्कम देणारे अभिकर्ता यांची नेमणूक करणे बाबत. | २,००,९७६/- प्रति वर्ष | ५,००० | ५००/- + १८ % GST | ५ वर्ष |

| | |
|---|---|
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ व दाखल करण्याची सुरवात दिनांक | दि. २२/०१/२०२५ दु. ११.०० AM वाजे पासून |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त व दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि. ०१/०२/२०२५ दु. ०४.०० PM वाजे पासून |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक (Technical) व (Financial) | दि. ०३/०२/२०२५ दु. ०४.०० PM वाजता शक्य झाल्यास |
| (Financial) ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ mail व SMS द्वारे कळविण्यता येईल. | |

निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शानाच्या http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचना पाहवयास मिळेल.

अधिक्षक
बाजार व परवाना
महानगरपालिका, अमरावती

(डॉ. मेघना वासनकर)
उपायुक्त (४)
महानगरपालिका, अमरावती

अमनपा/जसंवि/२२/२०२५/दिनांक २३/१/२०२५



# क्रेडाई प्रॉपर्टी एक्सपोचे आज उद्घाटन

### मनपा आयुक्त सचिन कलंत्रे व जि.प. सिईओ संजीता महापात्रा यांची प्रमुख उपस्थिती




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )**– अमरावती बिल्डर असोसिएशन च्या वतीने दि.24 ते 27 जानेवारी 2025 दरम्यान भव्य दिव्य अशा प्रॉपर्टी एक्सपोचे उद्घाटन उद्या शहराच्या मध्यभागी असलेल्या सायन्स कोअर च्या भव्य प्रांगणामध्ये सकाळी 11 वाजता होत आहे. या एक्सपोला मनपा आयुक्त सचिन कलंत्रे व जि.प.सिईओ संजीता महापात्रा यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

सतत 15 वर्षापासून अमरावतीकरांच्या सेवेत असलेला हा प्रॉपर्टी एक्सपो लोकांमध्ये अत्यंत लोकप्रिय झाला आहे. घर खरेदी करणारी किंवा गुंतवणूक करणारे सर्व व्यावसायिक, नोकरदार मंडळी व इतर सर्व क्षेत्रातील गुंतवणूकदार या एक्सपोची आतुरतेने वाट बघत असतात. मागील वर्षी अमरावतीकर शहरवासीयांनी एकंदरीत जवळजवळ 15000 लोकांनी या एक्सपोला भेट दिली होती. एकाच छताखाली संपूर्ण सुविधा देण्याच्या उद्देशाने या ग्रँड प्रॉपर्टी एक्सपोचे आयोजन करण्यात येत असते. शहराच्या विविध भागात असलेले घर प्लॉट किंवा फ्लॅट ची निवड या एक्सपोमध्ये एकाच ठिकाणी करायला मिळते. बऱ्याचशा बांधकामाची माहिती आपल्याकडे उपलब्ध नसते परंतु या एका छताखाली शहरातील संपूर्ण भागातील सर्व प्रॉपर्टी ग्राहकांसाठी क्रेडाईच्या या एक्सपो मध्ये उपलब्ध असणार आहे.

### 50 हून अधिक स्टॉल

एक्स्पोमध्ये ग्राहकांसाठी उपलब्ध राहणार असून शहरातील प्लॉट्स पासून ते बांधकाम साहित्य, बंगलो, रो-हाऊस, फ्लॅट, दुकाने या सर्वांच्या सजावटी करिता लागणाऱ्या इतर सर्वच गोष्टी जसे फर्निचर, पेंट्स व इतर आवश्यक वस्तू तसेच सर्वसामान्य व मध्यमवर्गीयांचे स्वप्न असलेल्या चार चाकी वाहन व दुचाकी गाड्या यांचे सुद्धा विविध कंपन्यांचे 50 पेक्षा अधिक स्टॉल्स या लावण्यात आले आहे. तसेच गृह कर्ज देणाऱ्या संस्था (बँक) यांचा सुद्धा समावेश असेल. त्यामुळे वास्तु खरेदी करण्याची तयारी असणाऱ्या ग्राहकांसाठी ही उत्तम अशी पर्वणी आहे.

### स्टॅम्प ड्युटीवर 50 टक्के सुट

चार दिवसीय होणाऱ्या या ग्रँड क्रीडाई प्रॉपर्टी एक्सपोचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे एक्सपो दरम्यान प्रॉपर्टी खरेदी करणाऱ्याला स्टॅम्प ड्युटीवर 50 टक्के सूट तथा ग्रँड एक्सपोला भेट देणाऱ्या प्रत्येकास कुपन द्वारे लकी ड्रॉ मध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार असून विजेत्यांना लाखोंची बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे. मागील वर्षी ज्या इच्छुक लोकांनी प्रॉपर्टी एक्सपोला भेट दिली त्यामध्ये प्रथम पारितोषिक ?क्टिवा स्कूटर द्वितीय पारितोषिक दहा ग्रॅम सोन्याचे नाणे व तृतीय पारितोषिक पाच ग्रॅम सोन्याचे नाणे लोकांनी जिंकले. क्रेडाईने सुरु केलेल्या या अभिनव संकल्पनेचे सर्व अमरावती करांनी कौतुक केले.अशा या भव्य ग्रँड क्रीडाई एक्सपोचे उद्घाटन आज सकाळी 11 वाजता होत आहे. तरी अमरावती मधील जनतेने या एक्सपोला भेट द्यावी अशी विनंती क्रेडाई अमरावतीचे अध्यक्ष निलेश ठाकरे सचिव रवींद्र गोरटे तसेच एक्सपोचे को-ऑर्डिनेटर कपिल आंडे व को- कोऑर्डिनेटर भूषण देशपांडे व क्रेडाई च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# विना परवाना खतांच्या विक्रीचा भंडाफोड

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 23 )** - मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिवरखेड परिसरात विना परवाना खताची साठवून करून विक्री सुरु असल्याच्या प्रकाराचा कृषी अधिकाऱ्यांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी कारवाई करत खंताची 600 जप्त करण्यात आली आहे. 8 जानेवारी 2025 रोजी ही कारवाई झाली. याप्रकरणी कृषी अधिकाऱ्यांनी 22 जानेवारी रोजी तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. काही लोक बेकायदेशीररीत्या खताची विक्री करत असल्याची गोपनीय माहिती मोर्शी पंचायत समितीचे कृषी अधिकारी राहुल सुभाषराव चौधरी (वय 47) यांना मिळाली होती. या आधारे राहुल चौधरी यांनी सापळा रचून कारवाई केली असता, तेथे विनापरवाना खतांची साठवणूक व विक्री होत असल्याचे आढळून आले. याप्रकरणात पोलिसांनी नीलेश जुहारमल पोरवाल, परेश पारसमल पोरवाल, आप्पासाहेब थोरात (सर्व सांगली) आणि नीलेश कृष्णराव भेळे (अंजनगावसुर्जी), मिलेनिया ॲग्रो लाईफ सिग्नेचर, मिरज रोड, सागली, यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अपहरणाची धमकी देऊन 35 लाखांची मागणी

## बिल्डरची तक्रार, चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती** - शहरातील एसटी कॉलनीतील रहिवाशाने बिल्डरला फोनवर शिवीगाळ करत 35 लाखांची मागणी केली. पैसे न दिल्यास अपहरण करण्याची धमकी दिली. ही घटना 20 जानेवारी रोजी रात्री 11 वाजता घडली. याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक सय्यद जब्बार सय्यद रसूल (48) यांनी 23 जानेवारी रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. यात्रकरणात पोलिसांनी आरोपी गोलू खान मन्नान खान (वय 35, रा. खिजर खान) व अन्य दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादीनुसार, सय्यद जब्बार हे जमीन खरेदी विक्रीच्या व्यवसायात आहेत. त्याचप्रमाणे सर्व्हे क्रमांक 116 नवसारी येथील जमिनीवर प्लॉट पाडून विकणे सुरू केले होते. दरम्यान 20 जानेवारी रोजी रात्री 11 वाजता आरोपी गोलू खान मन्नान खान याने सैय्यद जब्बार यांच्या मोबाईलवर करून, अश्लील शिवीगाळ केली तसेच 35 लाखांची मागणी केली. पैसे न दिल्यास अपहरण करण्याची धमकी दिली. असा आरोप सय्यद जब्बार यांनी गुरुवारी 23 जानेवारी रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीतून केला आहे.

# विद्यापीठ चौकातील तीन व्यवसायीकांचे खोके फोडले

**11 हजार 700 रुपये किमंतीचा मुद्देमाल लंपास**

**अमरावती** - विद्यापीठ चौकातील एक चहा कॅन्टींगसह विविध व्यवसायीकांचे खोके फोडून चोराने 11 हजार 700 रुपये किमंतीचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेची तक्रार श्रीकांत गणेश पत्र (34, रा. गुरुकृपा कॉलनी, अमरावती) यांनी 22 जानेवारी रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. श्रीकांत पत्रे हे 22 जानेवारी रोजी सकाळी आपले चहाचे कॅन्टींगचे उघडण्यासाठी गेले असता, त्यांना कॅन्टींगचे कुलुप तुटलेले दिसले आणि चोराने गॅस सिलिंडर, पितळी गंज व रोख चोरून नेल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे त्यांच्या शेजारी असणारे मयुर विजय झुडपे (रा. संकेत कॉलनी) यांच्या साऊथ दोसा सेंटरच्या खोक्याचेही कुलुप तुटलेले होते. त्यांच्या दुकानातूनही चोराने गॅस सिलिंडर व लोखंडी झारा चोरून नेल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे बासुंदी चहा नावाने असलेला खोका सुध्दा चोराने फोडल्याचे निदर्शनास आले. त्यामधील गॅस सिलिंडर, पितळी गंज व रोख चोरून नेल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे श्रीकांत पत्रे यांनी या घटनेची तक्रार फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली.

# जलशुध्दीकरण केंद्राच्या भांडारगृहात चोरी

**अमरावती** - तपोवन परिसरातील जलशुध्दीकरण केंद्राच्या भांडारगृहातून चोराने 3 लाख 8 हार 704 रुपयांचे साहित्य लंपास केले. या घटनेची तक्रार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कर्मचारी किशोर सहदेव लाहे (38, रा. शासकीय निवासस्थान, मालटेकडी) यांनी 22 जानेवारी रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. किशोर लाहे हे जीवन प्राधिकरणाच्या जलशुध्दीकरण केंद्रात सहायक भांडारपाल पदावर कार्यरत आहेत. त्यांना भांडारगृह पंपचालक रामेश्वर सुपकर यांनी सांगितले की, भांडारगृह गोदामाचे कुलुप तुटलेले आहे. त्यांनी ही माहिती प्रमुख कार्यकारी अभियंता विवेक सोळंके यांना दिली. त्यानंतर त्यांच्यासह अन्य अधिकार्यांनी भांडारगृहात जाऊन पाहणी केली असता, पाणीपुरवठ्याचे 3 लाख 8 हजार 704 रुपयांचे साहित्य चोरी गेल्याचे निदर्शनास आले.

# बापरे... खाकीतल्या सुनील ची वाळू अन् रेशनच्या तांदळातही भागीदारी!

## अवैध व्यवसायांवर पोलीसांची मेहेरनजर





***महासागर प्रतिनिधी***
***चांदूर बाजार,( दि.23 )*** *- चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायांना सुगीचे दिवस आले आहे. उदारवादी पोलीसांच्या मेहेरबानीने अवैध व्यवसायांना आश्रय मिळाला आहे. या आश्रय मिळविण्यामागे खाकीतल्या सुनील ची कृपा आहे. कारण सुनील ची चक्क अवैध वाळू वाहतूक व रेशन तांदळाची काळ्या बाजार विक्री करण्यात भागीदारी असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली आहे. आता हा खाकीतला सुनील पोलीसा नाक कापत आहे, की राखत आहे, हे पोलीस महानिरीक्षक व पोलीस अधिक्षकांनीच ठरवावे.*

शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या उत्खनन करून वाळू व अन्य गौण खनिजाची मोठ्या प्रमाणावर तस्करी केली जात आहे. 12 ट्रॅक्टरच्या सहाय्याने अवैधरित्या गौणखणीज वाहून नेले जात आहे. त्यातील दोन ट्रॅक्टर मध्य प्रदेशातील असून 7 ट्रॅक्टर शिरजगाव कसबा, दोन ट्रॅक्टर करजगाव तर एक ट्रॅक्टर थुगाव येथील आहे. या ट्रॅक्टर मालकांकडून एका ट्रिप साठी तीन ते साडेतीन हजार रुपये आकारले जात आहेत. स्थानिक पोलीस प्रशासनाला या संपूर्ण गैरव्यवहाराची माहिती असली तरी गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या व्यक्तींविरोधात पोलिसांकडून कुठलीही कारवाई केली जात नाही.


वाळू तस्करांचे पोलिसातील अधिकारी, कर्मचारी व गुन्हे शाखेतील पोलीस अधिकाऱ्यांसोबत आर्थिक देवाण-घेवाणीतून साटेलोटे असल्याची विश्वसनीय माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळेच पोलिसांच्या डोळ्यादेखत हा अवैध तस्करीचा गोरखधंदा सुरू आहे.

त्याचप्रमाणे शिरजगाव कसबा परिसरात रेशन दुकानातून लाभार्थ्यांना मिळणारा तांदूळ कमी भावात खरेदी करून खुल्या बाजारात तो चढ्या भावाने विकण्याचा गोरखधंदाही गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. याची माहिती तहसीलदार कार्यालय आणि पोलिसांनाही आहे. मात्र या अवैध व्यवसाय विरोधातही कुठलीही कारवाई करण्यात येत नाही.

तांदूळ तस्करीच्या अवैध व्यवसायात तर खाकीतला सुनील भागीदार असल्याची धक्कादायक माहिती तहसील कार्यालयातील एका कर्मचाऱ्याने दिली आहे. एकूणच शिरजगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस व अवैध व्यवसायिकांच्या संगनमतातूनच वाळू व तांदूळ तस्करी सोबतच अन्य गैरकायदेशीर व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असून त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच लक्ष घालावे अशी मागणी करण्यात येत आहे.

# बहिरमच्या यात्रेत बच्चू कडूंच्या शंकरपटाची धूम

## बैलगाडा शर्यतीला रंगत | शौकिनांची प्रचंड गर्दी | शेकडो स्पर्धकांचा सहभाग



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार ( दि. 23 )**- बहिरमच्या यात्रेत सध्या माजी आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाने आयोजित केलेल्या शंकरपटाची धूम बघायला मिळत आहे. राज्याच्या विविध भागातून या शंकरपाटासाठी दाखल झालेल्या स्पर्धकांच्या बैलगाडा शर्यतीला चांगलीच रंगत आली असून त्याचा आनंद लुटण्यासाठी बहिरममध्ये शंकरपट शौकिनांची मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळत आहे.


बहिरमची यात्रा आणि प्रहार संघटनेचा शंकरपट हे गेल्या काही वर्षातील एक अभिन्न समीकरण झाले आहे. यावर्षीही प्रहारच्या शंकर पटाला 21 जानेवारी पासून सुरुवात झाली. सुरुवातीपासूनच हा शंकरपट पाहण्यासाठी शौकिरांची झुंबड उडाली आहे.

गर्दीचा गेल्या वीस वर्षांचा रेकॉर्ड मोडला गेल्याचे आयोजकांनी सांगितले. पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनीही या शंकरपटात सहभाग घेतला आहे. एकापेक्षा एक सरस बैल जोड्या स्पर्धेत उतरल्या असून हा शंकरपट बहिरम यात्रेचे मुख्य आकर्षण ठरला आहे.

**लकी-चिमणा, मिसाइल-देवा, भीमा-लाडक्या च्या जोडीची कमाल**

या शंकरपटात वाढोणा येथील गणेश कावलकर यांच्या लकी - चिमणा जोडीने, जांभळी येथील मोहसिन पटेल यांच्या देवा- भाई या जोडीने तसेच मिशु अवनिका राठोड यांच्या मिसाइल- देवा या जोडीने आणि बुलढाणा येथील प्रशांत मोरे यांच्या भीमा-लाडक्या जोडीने आपापल्या गटातील शर्यती जिंकून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

**यंदाही बच्चू कडूं चा हुर्रार्रार्रा...**



माजी मंत्री बच्चू कडू यांना यंदाही शंकरपटात बैलजोडी हाकण्याचा मोह आवरला नाही. त्यांनी गुरुवारी (दि.23) पटाच्या अखेरच्या दिवशी हुर्रार्रार्रा करित 6.9 सेकंदात पट हाकलला. या पटात दि.21 जानेवारी ला-17 बैलजोड्या, 22 जानेवारी ला 152 बैलजोड्या तर 23 जानेवारीला 213 बैलजोड्या धावल्या.

# नागोराव दादा सदाफळे नवोदय विद्यालयात स्नेहसंमेलन

## मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात उदघाटन




**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड( दि.23 )**- येथील नागोराव दादा सदाफळे नवोदय विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये स्नेहसंमेलनाचे थाटात उदघाटन पार पडले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष श्रीपादराव पाटील होते. स्नेहसंमेलनाचे उदघाटन माजी आयुक्त अमरावती शेषरावजी खाडे यांनी केले. सर्वप्रथम कार्यक्रमाची दीपप्रज्वनाने सुरुवात झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत गीताने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा.डॉ.संदीप राऊत, प्रमुख उपस्थिती मध्ये प्रा.डॉ.प्रशांत विघे, सिनेट सदस्य केंद्रप्रमुख सुरेंद्र वानखडे, जेष्ठ पत्रकार महादेवराव नवघरे, नरेश अंगणानी, राजु अजमिरे, वृक्षमित्र नारायणराव मेंढे, संस्थेचे पदाधिकारी हरिमोहन ढोमने, जयंतराव पाटील, दिलीपराव कवठकर, शरदराव तिडके, प्रतिष्ठित नागरिक अनिलराव भुंते, सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश घोरमाडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सविता गजानन ठाकरे यांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनीता श्रीवास यांनी केले, तर आभार प्रदर्शन महादेव नागदेवे यांनी केले. कार्यक्रमाकरिता संजय बोनडे, प्रल्हाद बुले, निलेश रायचुरा, श्रीकांत विघे, प्रा.अमोल देशमुख, प्रा. हेमंत देशमुख, स्वाती पारिसे, कविता वरठी, दिलीपराव अजमिरे, अशोक डवरे, महादेव कदम यांनी प्रयत्न केले.

# पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.23 )**- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा (प्लेसमेंट ड्राईव्ह -02) नुकताच अमरावती येथे आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात 210 उमेदवारांनी सहभाग नोंदविला.

या मेळाव्यात जाधव गेअर्स प्रा. लि., सत्या मायक्रो कॅपिटल लि., ई. सी. ई. इंडिया प्रा.लि, दामोदर इंडस्ट्रीस प्रा. लि., डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, श्री. शिवाजी बहुउद्येशीय महाविद्यालय, विदर्भ आयुर्वेदीक महाविद्यालय, जिनस इंन्फ्रास्ट्रक्चर लि. इत्यादी खाजगी आस्थापनेच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. या मेळाव्यात 172 उमेदवारांनी मुलाखती दिल्या आणि त्यापैकी 82 उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. मेळाव्यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र येथील अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# महावितरण मधील कंत्राटी कामगारांचा कामबंद आंदोलनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपुर, ( दि.23 )**- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत मीटर रिडिंग आणि बिल वितरणाचे काम करणाऱ्या ठेकेदार कर्मचाऱ्यांनी 21 जानेवारी रोजी अचलपूर येथील कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर केले. या निवेदनात त्यांनी त्यांच्या विविध मागण्यांचे तत्काळ समाधान करण्याची मागणी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास 1 फेब्रुवारीपासून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

सरकारने प्रीपेड मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे भविष्यात या कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीचे सावट येण्याची भीती आहे. यामुळे, या कर्मचाऱ्यांनी 60 वर्षांच्या वयापर्यंत रोजगाराची हमी आणि इतर मागण्यांसाठी हिवाळी अधिवेशनात ऊर्जा सचिवांसोबत चर्चा केली होती. त्यावेळी आश्वासन देण्यात आले होते की, लवकरच या समस्यांवर तोडगा काढला जाईल. मात्र, अद्याप कोणताही ठोस निर्णय झाला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असून त्यांनी आज निषेध नोंदवून आंदोलनाचा इशारा दिला. या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये प्रमुख म्हणून संदीप भोयर, अमोल अग्रवाल, विजय कुकडकर, निकेश पिंपळकर, रामदार गीहे, सचिन तायडे, प्रविण वानखडे, मनोज बेदरकर, रोशन शेवाने, प्रकाश ढोले, विजय इंगळे, प्रकाश करवीक, महेंद्र रामेकर, नंदकुमार वानखडे, अयूबभाई, बबलू वानखडे, नितीन तराळकर, नितीन पिंगे, पंढरी हेकडे, दिनेश शनवारे, संजय कथीलकर, सुशांत शिरभाते, प्रशांत ढाकूलकर, मुकुंदरामदास गिऱ्हे आणि अंबुलकर यांचा समावेश होता.

# जिल्हा क्रीडा गुणवंत पुरस्कारांचे प्रजासत्ताक दिनी वितरण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.23 )** - राज्य शासनाच्या वतीने सन 2023-24 साठी जिल्हा पुरस्कारासाठी जिल्ह्यातून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच जिल्ह्यातील खेळाडूंचा गौरव व्हावा व क्रीडा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून जिल्हा क्रीडा पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे.

पुरस्कार प्रजासत्ताक दिनी 26 जानेवारी 2025 रोजी विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती यांचे प्रांगणात उद्योग राज्य मंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी दहा हजार रूपये, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार प्रा. डॉ. योगेश सुरेशराव निर्मळ (जलतरण)यांना देण्यात येईल.

डॉ. योगेश निर्मळ यांनी जलतरण या खेळाचे खेळाडू जिल्हास्तर ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत घडविले. यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर नॅशनल गेम्स, सिनिअर व ज्युनिअर राष्ट्रीय व राज्यस्तरीय अजिंक्यपद स्तरावर खेळाडूंना मार्गदर्शन केले.

# उत्तमसरा जि. प. हायस्कूलमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

## सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धांचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.23 )**- भातकुली तालुक्यातील उत्तमसरा च्या जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये वार्षिक शालेय स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. %इंद्रधनुष्य स्नेहसंमेलन 2025% असे शीर्षक या वार्षिक उत्सवाला देण्यात आले होते. या स्नेहसंमेलना अंतर्गत 21 ते 23 जानेवारी या कालावधीत शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मैदानी खेळ, पाककला स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, हस्तकला स्पर्धा, पुष्पगुच्छ स्पर्धा, प्रश्नमंजुषा, आनंद मेळावा इत्यादींचा समावेश होता. तीन दिवसीय स्नेहसंमेलनाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण शेवतकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच धर्मेंद्र मेहेरे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच संगीता मानकर, ग्रामपंचायत सदस्य शेवतकर ताई, डॉ. सोनाली देशमुख, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, ग्रामपंचायत सदस्य व गावातील मान्यवर नागरीक उपस्थित होते. या स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर, संतोष कुरेकर, चंद्रशेखर ब्राह्मणकर, उमेश बसरे, शितल भोपाळे, अश्विनी झाडे, जोत्स्ना हायगले, प्रतिभा नांदणे, प्राजक्ता भडके, भूषण बुरंगे, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी इंगळे, शिक्षक गजानन एलोने, सुनीता अकर्ते, प्रमोद कांबळे आदींनी प्रयत्न केले.

# सार्वजनिक सूचना

माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहिती आणि अधिकार आणि कागदपत्रांच्या आधारे, मी सर्व लोकांसाठी ही सार्वजनिक नोटीस जारी केली आहे, की खरेदी खताची मूळ प्रत सागर प्रकाशराव बुटे विक्रेता म्हणून आणि अमोल गणेश प्रांजळे खरेदीदार म्हणून दरम्यान अंमलात आणली गेली आहे. हे खरेदीखत सह दु.नि. अमरावती 3 च्या सब रजिस्ट्रारकडे रीतसर नोंदणीकृत असलेले अनुक्रमे नोंदणी क्रमांक 4252 दिनांक 27/11/2023 तसेच ॲग्रीमेंट टू सेल नोंदणी क्रमांक 3686 दिनांक 08/10/2013 असुन सदर खरेदी खताची व ॲग्रीमेंट टू सेल ची मुळ प्रती हरवली आहे. ह्या नोटिस द्वारे सर्वत्र लोकांस कळविणेत येते की ज्या कुणाचा ह्या खरेदी संबंधात कोणताही हितसंबंध किंवा हक्क वा उजर किवा ताबा असेल तसेच कर्ज असेल किंवा अधीकार असेल त्याकरीता नोटिस प्रकाशीत झालेपासुन 07 (सात) दिवसाचे आत खालील पत्यावर माहीती वा संबंधीत कागदपत्रांचा पुरावा सादर करावा. ह्यानंतर कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी

**स्वाक्षरी**
**ॲड. प्रविण भुस्कडे**
**सांगेकर नगर भक्तिधाम रोड**
**चांदूरबाजार जि. अमरावती.**
**मो. क्रमांक 8788355988**

शिक्का

# एसडीओ कार्यालयावर धडकले 25 गावातील ग्रामस्थ

## शेतीची वीज समस्या झाली गंभीर

**महासागर प्रतिनिधी**
**चिखलदरा/धारणी( दि.23 )**- चिखलदरा तालुक्यातील ढाकणा परिसरातील पंचवीस गावामध्ये विजेची गंभीर समस्या उद्भवत आहे. त्यामूळे त्रासलेल्या ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेत, धारणी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर (एसडीओ) धडक देत आपले गाऱ्हाणे मांडले. दिलेल्या निवेदनात विजेची ही समस्या त्वरीत निकाली काढण्याची मागणी करण्यात आली आहे, अन्यथा 28 जानेवारी रोजी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.



ग्रामस्थांची उपविभागीय अधिकारी प्रियंवदा म्हाडदलकर यांचेशी भेटून समस्यांचे निवेदन देवून चर्चा केली. विजेच्या अभावी पंचवीस गावाची पाणीपुरवठा योजना बंद असल्याने नागरिकांना नदीवरून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. त्या पाण्याने अनेक साथीचे आजार पसरत आहेत. गर्भवती स्तनदा माता आजारी पडत आहेत. कुपोषणाला जास्त चालना मिळत आहेत. मोबाईल चार्ज होत नसल्याने अनेक समस्या निर्माण होत आहेत. बिजू धावडी येथे महाराष्ट्र बँक आहे विजेचा व्होल्टेज मिळत नसल्याने बँकेचे व्यवहार ठप्प होत आहेत. त्यामूळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**पोलीस स्टेशनमध्येही दिली धडक**

गावकऱ्यांनी पोलिस स्टेशन येथे धडक देत निवेदन दिले. पोलिस उपनिरीक्षक सतिश झालटे यांनी महवितरण कंपनीचे उपअभियंता यमगुंटीवर यांना पोलिस स्टेशन मध्ये बोलवून गावकऱ्यांच्या समस्यांचे त्वरीत निराकरण करण्याबाबत चर्चा केली. यावेळी गडगां, भांडूम ग्रामपंचायत चे सरपंच संगीता शालिकराम बेठेकर, उपसरपंच परमानंद जाधव, ज्ञानदेव येवले, हतिदा येथील सरपंच गंगा जावरकर, तातरा ग्राम पंचायत चे सरपंच बिसुलाल दहिकर, उपसरपंच विनोद सेलुकर, महेंद्र धांडे, बिजु धावडी चे सरपंच किशोर भिलावेकर, प्रेमलाल जावरकर, गणपत हेकडे, बाबलाल जांबेकर, रामु कासदेकर यांच्यासह शेकडो गावकरी उपस्थित होते.

आम्ही आमच्या घरातील सोने, चांदी गहाण ठेवून शेत पिकविले परंतू वीज पुरवठा अभावी पिकं मरत आहे. गावात पिण्याच्या पाण्याचे संकट उद्भवत आहे, प्रशासनाने आम्हाला न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन केल्याशिवाय आम्हाला पर्याय नाही.

**निवेदनकर्ते गावकरी**